ऑनलाईन ॲप्लीकेशनमधील "अपलोड डॉक्यूमेन्टस्" द्वारे संबंधित कागदपत्राच्या पीडीएफ आपण अपलोड करू शकता. अपलोड डॉक्युमेन्टस्मध्ये आपल्या अर्जानुसार विविध प्रकारची कागदपत्रे अपलोड करावी लागतील ज्यामुळे तुमचा अर्ज पूर्ण होऊ शकेल.

टिप :

- आपल्या अर्जाच्या स्वरुपानुसार आवश्यक कागदपत्रांची यादी आपणास अपलोड डॉक्युमेन्टस् या भागात दिसेल. डि.फार्म , बी. फार्म आणि फार्म डी. उत्तीर्ण झालेल्या अर्जदारानी सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी वेगवेगळी आहे. (डि.फार्म , बी. फार्म आणि फार्म डी. या शैक्षणिक अर्हता पंजीकरणासाठी पात्र असतील. एम्.फार्म आणि पी. एच्डी. या पंजीकरणानंतरच्या अतिरिक्त शैक्षणिक अर्हता म्हणून ग्राह्य धरल्या जातील - संदर्भ : फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया )
- यादीमध्ये नमूद काही कागदपत्रे ही अत्यावश्यक आहेत , जी अपलोड न केल्यास आपला अर्ज पूर्ण होणार नाही व प्रणालीत सादर होणार नाही. काही कागदपत्र ही पर्यायी आहेत. त्यामुळे सूचना काळजीपूर्वक वाचाव्या.
- काही कागदपत्र अपलोड करण्यासाठी आपणास पर्याय दिले जातील जसे ओळखपत्र म्हणून आधारकार्ड / पासपोर्ट इ. सादर करावे. आपण दोन्ही कागदपत्र सादर करू शकता. परंतू यापैकी अशावेळी त्यापैकी केवळ एकच कागदपत्र अपलोड करणे गरजेचे आहे.

<u>अपलोड करण्यासाठीचे नियम / मार्गदर्शक सूचना</u>

- अपलोड करण्यासाठीच्या फाईल्स पीडीएफ प्रकारच्या असाव्यात म्हणजेच त्या पीडीएफ प्रकारात स्कॅन केलेल्या असाव्या त्यामुळे कागदपत्र स्कॅन करून सेव्ह करताना स्कॅन्ड टू पीडीएफ हा पर्याय निवडावा.
- फाईलचा आकार :- १५०केबी ते २००केबी
- पीडीएफ ग्रे स्केलमध्ये करावी. ब्लॅक ॲण्ड व्हाईट पी.डी.एफ्. स्विकारली जाणार नाही.
- स्कॅन फाईलचा आकार २००केबी पेक्षा अधिक असू नये. फाईलचा आकार त्यापेक्षा अधिक होत असल्यास स्कॅनरचे सेटींग बदलावे जसे डीपीआय रेसॉल्यूशन, कलर ॲज ग्रेस्केल इ. व फाईल सेव्ह करावी.
- एमएस वर्ल्ड किंवा तत्सम प्रकारातील फाईल अपलोड करावयाची असल्यास संगणक प्रणालीतील सेव्ह ॲज पीडीएफ ही सूचना वापरून सेव्ह करावी व नंतर अपलोड करावी. (प्रथम कागदपत्र छपाई करून त्यानंतर स्कॅन करून पीडीएफ करण्याऐवजी सदर सूचनेचा वापर करावा. )

- वेगवेगळया प्रकारची कागदपत्र एकाच पीडीएफ मध्ये सेव्ह करू नयेत. त्यामुळे तुमचा अर्ज बाद ठरू शकतो आणि परत केला जाऊ शकतो. त्यामुळे पुन्हा सर्व प्रक्रिया करण्यात वेळ जाऊ शकतो.
- स्कॅन करून तयार केलेली पीडीएफ अपलोड करण्यापूर्वी उघडून पहावी व फाईल वाचण्यायोग्य आणि पूर्ण असल्याची खात्री करून घ्यावी. वाचण्यायोग्य नसलेल्या व अपूर्ण फाईल अपलोड करून काहीही उपयोग होणार नाही.

**इतर सूचना :**

- अपलोड करावयाच्या फाईलच्या आकाराबाबत काही बंधने आहेत (वेगवेगळया प्रकारच्या फाईलचे आकारही वेगवेगळे असतात) अपलोड करताना फाईलचा आकार मोठा असल्याचा मेसेज आल्यास स्कॅन डेन्सीटीचा वापर करून लहान आकारात फाईल पुन्हा स्कॅन करावी व नंतर ही लहान आकाराची फाईल अपलोड करावी.
- फाईल अपलोड करताना प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी थोडा वेळ लागेल (इंटरनेटच्या कार्यक्षमतेनुसार). मोठ्या आकाराच्या फाईल अपलोड होण्यासाठी जास्त वेळ लागेल.

**टिप : सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी**

**महाराष्ट्रातून प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता**

| **डी. फार्म** | **बी. फार्म.** | **फार्म. डी.** |
|---|---|---|
| - पहिल्या व अंतिम वर्षाच्या गुणपत्रिका<br>- डिप्लोमा फार्मसी कॉलेज लिव्हिंग किंवा ट्रान्सफर सर्टिफिकेट<br>- एज्यु. रेग्युलेशननुसार ५०० तासांचे प्रॅक्टीकल ट्रेनिंग पूर्ण केल्याचा फॉर्म<br>-एसएससी पासिंग सर्टीफिकेट | - अंतिम वर्षाची गुणपत्रिका<br>- डिग्री फार्मसी कॉलेज लिव्हिंग किंवा ट्रान्सफर सर्टिफिकेट<br>- प्रोव्हिजनल डिग्री सर्टीफिकेट / कन्व्होकेशन सर्टीफिकेट<br>-एसएससी पासिंग सर्टीफिकेट | - अंतिम वर्षाची गुणपत्रिका<br>- फार्मसी कॉलेज लिव्हिंग किंवा ट्रान्सफर सर्टिफिकेट<br>- प्रोव्हिजनल डिग्री सर्टीफिकेट / कन्व्होकेशन सर्टीफिकेट<br>-एसएससी पासिंग सर्टीफिकेट |

**ओळखपत्र (कोणतेही एक)** : पॅन कार्ड , आधार कार्ड , पासपोर्ट , इलेक्शन कार्ड

**पत्त्याचा पुरावा (कोणताही एक)** : आधार कार्ड , पासपोर्ट , इलेक्शन कार्ड , डोमिसाईल सर्टिफिकेट

**अर्जदाराच्या फार्मसी कॉलेजच्या प्राचार्यांनी साक्षांकित केलेले ओळखपत्र (दिलेल्या नमुन्यानुसार)**

**ॲफिडेव्हीट फॉरमॅट ए डाऊनलोड करावा व १०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर तयार करून नोटराईज करावे**

जर आपणास फार्मसी डिप्लोमा किंवा बी. फार्म. पूर्ण करून तीन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ झाला असेल किंवा आपण महाराष्ट्राबाहेरील शैक्षणिक संस्थेतून डी. फार्म. /बी. फार्म./फार्म. डी. पूर्ण केले असल्यास ॲफिडेव्हीट फॉर्मट ए करणे आवश्यक आहे. सदर ॲफिडेव्हिट मूळ कागदपत्र पडताळणीच्यावेळी मूळ प्रतीत कार्यालयात जमा करावे.

**ॲफिडेव्हीट फॉरमॅट बी डाऊनलोड करावा व १०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर तयार करून नोटराईज करावे**

महाराष्ट्राबाहेरील पंजीकृत औषध व्यवसायी असल्यास ॲफिडेव्हीट फॉर्मट बी करणे आवश्यक आहे. सदर ॲफिडेव्हिट मूळ कागदपत्र पडताळणीच्यावेळी मूळ प्रतीत कार्यालयात जमा करावे.

विवाहित महिलांना आपले विवाहा नंतरचे नांव पंजीकरण दाखल्यावर असणे अपेक्षित असल्यास त्यांनी विवाह नोंदणीचा दाखला नवीन नाव व पत्त्यासह सादर करावा.